आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२७ जून २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशाच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग परिसंस्था मजबूत असणं आवश्यक असल्याचं, राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य बाजारमूल्य मिळण्यासाठी पुणे इथं कापूस, हळद आणि मका पिकांसाठी 'हेजिंग डेस्क' सुरू

- २०२६ च्या साखर हंगामात भारतातलं साखर उत्पादन साडेतीन कोटी टनांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा, राज्यात ऊसाचं क्षेत्र आणि उत्पादन वाढणार

**आणि**

- हॉकी इंडिया मास्टर्स कप स्पर्धेत पुरुष गटातल्या विजेतेपदासाठी आज महाराष्ट्राची तामिळनाडूशी लढत

**<><><><>**

देशाच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी मजबूत MSME अर्थात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग परिसंस्था आवश्यक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं आंतरराष्ट्रीय MSME दिनाच्या कार्यक्रमाला त्या संबोधित करत होत्या. MSME क्षेत्र देशाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्या म्हणाल्या.

MSME क्षेत्र ग्रामीण आणि मागासलेल्या भागात रोजगाराच्या संधी निर्माण करत असल्याचं त्यांनी म्हटलं. MSME क्षेत्र हे शेतीनंतर देशातील दुसऱ्या क्रमांकाचं रोजगार निर्माण करणारं क्षेत्र असल्याचं राष्ट्रपती मुर्मू यांनी अधोरेखित केलं. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग हे भारतीय आणि जागतिक अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. जगभरात MSME क्षेत्राची महत्त्वाची भूमिका ओळखून संयुक्त राष्ट्रांनी २०१७ मध्ये २७ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय MSME दिन म्हणून घोषित केला. यंदाचा MSME दिवसाचा विषय, शाश्वत विकास आणि नवोन्मेषाचे चालक म्हणून MSME ची भूमिका वाढवणं हा आहे.

**<><><><>**

भारत आणि चीन दरम्यान पुन्हा एकदा विश्वास निर्माण करण्यासाठी कायमस्वरूपी तोडगा काढण्यावर भारतानं कायम भर दिल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. चीनचे संरक्षणमंत्री ॲडमिरल डोंग जुन यांच्याशी झालेल्या द्विपक्षीय बैठकीत ते बोलत होते. चीनमध्ये सुरू असलेल्या संरक्षणमंत्र्यांच्या SCO च्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर ही बैठक झाली.

२०२०मध्ये झालेल्या सीमावादानंतर ताणले गेलेले दोन्ही देशांमधील संबंध सर्वसामान्य व्हावेत, यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांबद्दल राजनाथ सिंह यांनी समाधान व्यक्त केलं. परस्पर विश्वास, शांततेचे वातावरण आणि शेजारधर्म जोपासला जावा, आशिया आणि जगात स्थैर्य टिकवण्यासाठी सहकार्याची गरज असल्याचा मुद्दा सिंह यांनी उपस्थित केला. सीमावाद, तणाव निवळवणं, सीमा व्यवस्थापन आणि सीमारेषांची निश्चितीच्या मुद्द्यांवर विविध पातळ्यांवर सल्लामसलत सुरू ठेवण्याचं दोन्ही नेत्यांनी मान्य केलं. या बैठकीत राजनाथ सिंह यांनी पहलगामचा हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरची माहिती चीनच्या संरक्षणमंत्र्यांना दिली.

रशियाचे संरक्षण मंत्री आंद्रे बेलोउसॉव यांच्याशीही संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी द्विपक्षीय बैठक घेतली. बेलारूस, ताजिकिस्तान आणि कजाकिस्तानच्या संरक्षणमंत्र्यांबरोबरही संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी बैठका घेतल्या.

<><><><>

शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य बाजारमूल्य मिळावं यासाठी बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प, स्मार्टअंतर्गत पुणे इथं कापूस, हळद आणि मका या पिकांसाठी ‘हेजिंग डेस्क’ सुरू केला आहे. टप्प्याटप्प्यानं इतर पिकांसाठी हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे शेतकरी भविष्यात त्यांच्या उत्पादनांच्या किंमतीत चढ-उतारामुळे होणारे नुकसान टाळू शकतात. हा उपक्रम कृषी क्षेत्रात विकासाच्या दिशेनं एक महत्वाचं पाऊल असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाची माहिती देताना म्हटलं आहे. हेजिंग डेस्क’ मध्ये भविष्यात विविध पर्यांयाचा विचार करण्यासाठी आणि जोखीम व्यवस्थापनासाठी शेतकरी उत्पादक संघटना आणि क्लस्टर आधारित व्यवसाय संघटना यांना सेवा कमोडिटी कराराबद्दल तज्ज्ञ माहिती देतील. तीन हजारपेक्षा अधिक शेतकऱ्यांना हेजिंग साधने आणि धोरणांवर प्रशिक्षण देण्यात येणार आहे. मका,

कापूस आणि हळदीसाठी ॲन्युअल कमोडिटी प्राईस रिस्क असेसमेंट रिपोर्टस तयार करून यामध्ये पिकाची सद्यस्थिती, भविष्यकालीन अंदाज आणि धोरणविषयक उपाय सुचवले जातील.

<><><>

सन २०२६च्या साखर हंगामात भारतातलं साखर उत्पादन १५ टक्क्यानं वाढून साडेतीन कोटी टनांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडल्यामुळे ही वाढ होण्याची शक्यता एका पतमानांकन संस्थेच्या अहवालात वर्तवली आहे. जास्त पाऊस पडल्यामुळे ऊस उत्पादक राज्यांमध्ये, विशेषतः महाराष्ट्र आणि कर्नाटकात, उसाचं उत्पादन आणि लागवडीखालचं क्षेत्र वाढणार आहे. पुरवठा वाढल्यामुळे देशांतर्गत पुरवठ्याची चिंता कमी होईल. धोरणात्मक परिस्थिती अनुकूल राहिली तर इथेनॉल उत्पादनही मोठ्या प्रमाणात होईल, असं या अहवालात म्हटलं आहे.

<><><>

भविष्यातला माणूस घडविण्यासाठी जे आवश्यक आहे, त्यानुसार शैक्षणिक धोरणाचं उद्दिष्ट्य निश्चित करण्याची गरज केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली आहे. ते आज नागपुरात मंथनच्या वतीनं आयोजित शिक्षक परिसंवादात बोलत होते. जगात समाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे. आपल्याला विश्वगुरू व्हायचं आहे, जगातली तिसरी अर्थव्यवस्था व्हायचं आहे आणि आत्मनिर्भर भारत निर्माण करायचा आहे, असं प्रधानमंत्र्यांचं स्वप्न आहे. विश्वगुरू म्हणून मान्यता फक्त आर्थिक आधारावर शक्य नाही. त्यासाठी आपली संस्कृती, परंपरा, मूल्याधिष्ठित जीवन पद्धती याचा देखील विचार करावा लागेल, असं ते म्हणाले.

<><><>

हॉकी इंडिया मास्टर्स कप स्पर्धेत महिला आणि पुरुष गटातील अंतिम सामने आज दुपारी चेन्नईत होणार आहे. पुरुष गटात तमिळनाडू आणि महाराष्ट्राच्या संघाची लढत आज दुपारी चार वाजता होणार आहे.

महिलांच्या गटातील तिसऱ्या आणि चौथ्या स्थानासाठी आज झालेल्या सामन्यात हरयाणानं यजमान तमिळनाडूचा ४-३ असा पराभव केला. तर पुरुषांच्या गटात चंदीगढनं ओदिशावर २-१ अशी मात करत तिसरा क्रमांक मिळवला.

<><><>

हरयाणातल्या रोहतक इथं झालेल्या १७ वर्षांखालच्या कनिष्ठ गट राष्ट्रीय मुष्टियुद्ध स्पर्धेत सर्व्हिस स्पोर्टस कंट्रोल बोर्डाचे दोन्ही संघ विजेते ठरले आहेत. हरयाणाचा संघ दुसऱ्या तर महाराष्ट्राच्या मुलांचा संघ तिसऱ्या स्थानावर राहिला.

<><><>

दुसऱ्या आशियायी स्क्वॉश दुहेरी अजिंक्यपद स्पर्धेत भारतानं काल तिन्ही गटातलं विजेतेपद पटकावलं. पुरुष दुहेरीच्या अंतिम सामन्यात अग्रमानांकित अभय सिंग आणि वेल्वन लेंतिल कुमार यांनी पाकिस्तानच्या नूर जमान आणि नसीर इक्बाल यांच्यावर २- १ अशी मात केली. महिला दुहेरीचं अजिंक्यपद द्वितीय मानांकित जोशना चिनप्पा आणि अनाहत सिंग या भारतीय जोडीनं पटकावलं. तर अव्वल मानांकित अभय आणि अनाहत या जोडीनं मिश्र दुहेरीत २-० नं विजय मिळवला.

<><><>

६१ व्या राज्य मराठी चित्रपट पुरस्काराच्या प्राथमिक फेरीची नामांकनं जाहीर झाली आहेत. तसंच तांत्रिक आणि बालकलाकार विभागातल्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. वर्ष २०२३ या वर्षातल्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्काराच्या अंतिम फेरीसाठी आत्मपॅम्प्लेट, जिप्सी, नाळ २, रौंदळ, तेरवं, जग्गु आणि ज्युलिएट, भेरा, आशा, झिम्मा २, अलीबाबा आणि चाळीशीतले चोर या दहा चित्रपटांना अंतिम फेरीकरता नामांकनं मिळाली आहेत.

उत्कृष्ट बालकलाकार म्हणून कबीर खंदारे आणि त्रिशा ठोसर, यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्याचबरोबर उत्कृष्ट कला दिग्दर्शन अमेय भालेराव, उत्कृष्ट छाया लेखन प्रवीण सोनावणे, उत्कृष्ट संकलन अक्षय शिंदे, उत्कृष्ट ध्वनिमुद्रण कुणाल लोळसुरे, उत्कृष्ट ध्वनी संयोजन विकास खंदारे, उत्कृष्ट वेशभूषा मानसी अत्तरदे, उत्कृष्ट रंगभूषा हमीद शेख, मनाली भोसले तांत्रिक विभागातील पुरस्कार जाहीर झाले आहेत.

<><><>

ओडिशामध्ये पुरी इथं भगवान जगन्नाथ आणि त्यांची भावंडं बलभद्र आणि सुभद्रा या देवतांच्या रथयात्रेला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली. त्यासाठी जगभरातील हजारो भक्त जमले आहेत. ही रथयात्रा तिन्ही देवतांना श्री गुंदीचा मंदिराकडे नऊ दिवसांसाठी घेऊन

जाते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ओडिशात पुरी इथल्या पवित्र रथयात्रेच्या शुभ प्रसंगी सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><>

मध्य रेल्वेतर्फे आषाढी एकादशीनिमित्त 3 एकेरी विशेष गाड्या चालवणार आहे. पुणे ते मिरज, मिरज ते नागपूर आणि मिरज ते लातूर अशा गाड्या 1 ते 10 जुलैपर्यंत चालवल्या जाणार आहेत.

//<><><><>//